गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले  अंक ३३७ वा  शनिवार २७ एप्रिल २०२४  पाने ४  किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 337 | Date : 27/04/2024  blow Saturday  Page 4  Price 4

## जुन्या पेन्शनसाठी रेल्वे कर्मचाऱ्यांचा संपाचा इशारा

नवी दिल्ली : केंद्र सरकारने राष्ट्रीय पेन्शन योजनेखाली घोषित केलेले लाभ आणि फायदे लागू केले नसल्याच्या निषेधार्थ देशातील रेल्वे व सरकारी कर्मचारी पुढील दोन महिन्यानंतर बेमुदत संपावर जाणार आहेत. ऑल इंडिया रेल्वे मेन्स फेडरेशनच्या नवी दिल्लीतील ताल कटोरा स्टेडियममध्ये गुरुवारी झालेल्या अधिवेशनात हा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय पेन्शन योजनेतील (एनपीएस) त्रुटी दूर करून जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी केंद्र सरकारने संयुक्त समिती गठीत केली आहे. या समितीचा अहवाल येईपर्यंत पुढील दोन महिने आम्ही वाट बघणार आहोत. त्यानंतर सर्व कर्मचारी जुन्या पेन्शनसाठी बेमुदत काळासाठी संपावर जातील, असा इशारा रेल्वे मेन्स फेडरेशनच्या अधिवेशनात देण्यात आला.

## शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही : मुख्यमंत्री

मुंबई : जिथे दुष्काळ आहे, जिथे अवकाळी पाऊस तसेच गारपिटीमुळे नुकसान झाले आहे, तिथे सर्व विभागीय आयुक्त, कलेक्टर, मुख्य सचिव यांना सूचना दिलेल्या आहेत. निवडणुका येतात, जातात पण शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. पंचनामे होतील, त्यांना तत्काळ नुकसानभरपाई मिळेल, मोबदला मिळेल, जिथे पाणी टंचाई आहे, तिथे टँकरने पाणी मिळेल, चारा मिळेल, कुठेही काहीही कमी पडणार नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. शिंदे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना शपथपत्रावरून टीका केली. शरद पवार कृषिमंत्री होते, चारवेळा मुख्यमंत्री होते. मग त्यांच्यावर अशी वेळ का आली? अडीच वर्षे त्यांच्याकडे सरकार होते. गेल्या दोन वर्षांत शेतकऱ्यांना आम्ही मोबदला दिला. १५ हजार कोटी अतिवृष्टी आणि गारपिटीच्या काळात दिले. एक रुपयात पीकविमा योजना दिली.

# ८८ मतदारसंघांत ६४.३५ टक्के मतदान

## देशभरात दुसऱ्या टप्प्यासाठीही कमी प्रतिसाद



**मतांचा टक्का (संध्या.५वाजेपर्यंत)**

**आसाम ७०.६६ बिहार ५३.०३ छत्तीसगढ ७२.१३ जम्मू-काश्मीर ६७.२२ कर्नाटक ६३.९० मध्य प्रदेश ५४.८३ मणिपूर ७६.०६ त्रिपुरा ७७.५३ पश्चिम बंगाल ७१.८४ केरळ ६३.९७ महाराष्ट्र ५३.५१ राजस्थान ५९.१९ उत्तर प्रदेश ५२.७४**

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात शुक्रवारी १३ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील ८८ मतदारसंघांमध्ये संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सरासरी ६४.३५ टक्के मतदान झाले. २०१९ मध्ये दुसऱ्या टप्प्यामध्ये ६९.४५ मतदान झाले होते. गेल्या वेळच्या तुलनेत या वेळी मतांची टक्केवारी पाचने घसरली. २६ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यामध्ये सुमारे ६४ टक्के मतदान झाले होते. दोन्ही टप्प्यांमध्ये सरासरी मतांचा टक्का एकसमान राहिल्याचे दिसते.महाराष्ट्रातील ८ मतदारसंघांमध्ये ३ वाजेपर्यंत सर्वात कमी ४३.०१ टक्के मतदान झाले होते. त्यामध्ये पुढील दोन तासांमध्ये सुधारणा होऊन संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मतांचा टक्का १० टक्क्यांनी वाढत ५३.५१ टक्क्यांवर पोहोचला. पहिल्या टप्प्यामध्ये ५ मतदारसंघामध्ये सरासरी ६३.७० टक्के मतदान झाले होते.

दुसऱ्या टप्प्यातही संध्याकाळी पाचवाजेपर्यंत त्रिपुरामध्ये सर्वाधिक ७७.५३ टक्के मतदान झाले. त्या खालोखाल मणिपूरमध्ये ७६.०६ टक्के मतदान झाले. उत्तर प्रदेशने ५२.७४ टक्के मतांचा नीचांक नोंदवला. पहिल्या टप्प्यामध्ये उत्तर प्रदेशात ६१.११ टक्के मतदान झाले होते दुसऱ्या टप्प्यामध्ये बिहारमध्ये ५३.०३ टक्के मतदान झाले. पहिल्या टप्प्यामध्ये बिहारमध्ये सर्वात कमी ४९.२६ टक्के मतदानाची नोंद झाली होती.

दुसऱ्या टप्प्यात केरळमधील २०, कर्नाटकातील १४, राजस्थानमधील १३, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी ८, मध्य प्रदेशातील ७, आसाम आणि बिहारमधील प्रत्येकी ५, पश्चिम बंगाल व छत्तीसगडमधील प्रत्येकी तीन जागांसाठी तर, जम्मू-काश्मीर, मणिपूर आणि त्रिपुरातील प्रत्येकी एक अशा १३ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील ८८ मतदारसंघांमध्ये मतदान शांततेत पार पडले.

पश्चिम बंगालमधील तीन मतदारसंघांमधील मतदान केंद्रांमध्ये मतदानयंत्रांतील बिघाडासंदर्भात सत्ताधारी सत्ताधारी । पान २ वर

## मोदी, राहुल यांच्या विधानांबाबत निवडणूक आयोगाची सावध भूमिका

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी व काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्याविरोधात झालेल्या आचारसंहिता भंगाच्या तक्रारीवरून केंद्रीय निवडणूक आयोगाने गुरुवारी दोन्ही पक्षांच्या राष्ट्रीय अध्यक्षांना नोटीस बजावली. २९ एप्रिल





रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत उत्तर देण्याचे निर्देश यात देण्यात आले. मात्र मोदी व गांधी यांना थेट नोटीस बजावणे अपेक्षित असताना पक्षाध्यक्षांना नोटीस पाठवून आयोगाने बचावात्मक पवित्रा घेतल्याची चर्चा आहे.राजस्थानातील बांसवाडा येथील पंतप्रधानांच्या भाषणाविरोधात काँग्रेसने तर केरळच्या कोट्टायममधील राहुल गांधी यांच्या विधानांविरोधात भाजपने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. या तक्रारींच्या आधारे आयोगाने गुरुवारी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा व काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना दोन पानी नोटिसा पाठविल्या. विशेष म्हणजे या नोटिसांमध्ये मोदी किंवा गांधी या दोघांच्याही नावांचा उल्लेख केलेला नसून लेखी तक्रारींच्या प्रती जोडण्यात आल्या आहेत. प्रचारसभेतील भाषणांबद्दल प्रमुख प्रचारकच जबाबदार असतील असे नोटिसांमध्ये नमूद करण्यात आले आहे. प्रमुख प्रचारकांनी (मोदी व गांधी) प्रचारसभेमध्ये भाषणाचा दर्जा टिकवणे अपेक्षित आहे. आवेशपूर्ण भाषण करताना भाषणाची पातळी खालावू शकते. त्यामुळे दक्षता बाळगली पाहिजे, असे आयोगाने म्हटले आहे. एकाबाजूला आयोगाने आक्षेपार्ह भाषणांबद्दल नेत्यांना जबाबदार धरले असले तरी, 'पक्षांना त्यांच्या उमेदवारांच्या । पान २ वर

## आबा कांबळे खून खटल्यात वृद्ध पैलवानासह सातजणांना जन्मठेप

सोलापूर/प्रतिनिधी : दोन तालमींच्या भांडणातून स्वतःच्या मुलाच्या झालेल्या खुनाचा सूड उगविण्यासाठी मुलाच्या मारेकऱ्याचा निर्घृणपणे खून केल्याबद्दल वयोवृद्ध पैलवानासह सातजणांना सोलापूरच्या सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. या गाजलेल्या खटल्याकडे सोलापूरकरांचे लक्ष वेधले होते.



पत्रा तालीम आणि पाणीवेस तालीम या दोन तालमीतील भांडणातून पूर्वीच्या खुनाचा सूड उगविण्यात आला होता. यात पत्रा तालीम भागात राहणाऱ्या सत्यवान ऊर्फ आबा कांबळे (वय ३६) याचा ७ जुलै २०१८ रोजी रात्री नव्या पेठेजवळील डाळिंबी आडलगत मोबाईल गल्लीत कोयत्यांनी सपासप वार करून खून झाला होता. या खटल्यात सुरेश अभिमन्यू शिंदे ऊर्फ गामा पैलवान (वय ७४, रा. पाणीवेस तालीम) याच्यासह त्याचे साथीदार गणेश ऊर्फ अभिमन्यू चंद्रशेखर शिंदे (वय ३२, निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर), रविराज दत्तात्रेय शिंदे (वय ३२), प्रशांत ऊर्फ आप्पा पांडुरंग शिंदे (वय ३६, दोघे रा. शाहीर वस्ती, भवानीपेठ, सोलापूर), नीलेश प्रकाश महामुनी (वय ४५, रा. दत्त चौक, सोलापूर), तौसीफ गुडूलाल विजापुरे (वय २७, रा. मेहताबनगर, मुळेगाव रोड, सोलापूर) आणि विनित ऊर्फ ईश्र्वर भालचंद्र खाणोरे (वय ३१, रा. पुणे) या सात आरोपींना जिल्हा सत्र न्यायाधीश संगीता शिंदे यांनी दोषी धरून जन्मठेप आणि इतर कलमांखाली शिक्षेसह प्रत्येकी १७ हजार रुपये दंड ठोठावला.

पत्रा तालीम आणि पाणीवेस तालमीत २००४ । पान २ वर

## जिल्हास्तरीय माध्यम प्रामाणिकरण व संनियंत्रण समितीला जनरल निरीक्षक यांची भेट व कामकाजाची पाहणी

### मुद्रित, इलेक्ट्रॉनिक व सोशल मीडिया माध्यमातून प्रसारित होणाऱ्या बातम्या, जाहिराती व प्रचाराबाबत दक्ष रहावे : जनरल निरीक्षक मिथिलेश मिश्र

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समितीने (एमसीएमसी) निर्भय व निष्पक्ष पदधतीने मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसारित होणाऱ्या पेड न्यूज व जाहिरातीसह सोशल मिडीयाच्या वापरावरही अतिशय जबाबदारी व काळजीपूर्वक लक्ष ठेवावे अशी सुचना सोलापूर लोकसभेचे जनरल निरीक्षक मिथिलेश मिश्र यांनी केली.



सोलापूर लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत जिल्हास्तरीय माध्यम प्रामाणिकरण व संनियंत्रण कक्षाला भेट दिल्याप्रसंगी जनरल निरीक्षक मिथिलेश मिश्र हे बोलत होते. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव सुनिल सोनटक्के, संपर्क अधिकारी तथा बांधकाम विभाग २ चे कार्यकारी अभियंता हेमंत चौगुले , समिती सदस्य श्रीराम राऊत, रफिक शेख, सचिन सोनवणे , गणेश बिराजदार आदी उपस्थित होते. सोलापूर लोकसभा निवडणूक काळात जिल्हा माध्यम प्रमाणिकरण व माध्यम सनियंत्रण समितीचे कामकाज अतिशय महत्वाचे आहे.सर्व समाज माध्यमाद्वारे उमेदवार यांच्या होणाऱ्या प्रचारावरही या समितीने काळजीपूर्वक लक्ष ठेवणे गरजेच आहे.शिवाय टी.व्हि, रेडिओ तसेच वृत्तपत्रात येणाऱ्या संशयीत पेड न्यूज , जाहिरात शोधून संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात तो खर्च समाविष्ठ नियमितपणे करण्यात यावा.भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे अत्यंत काटेकोरपणे समितीने कामकाज करुन समितीने दैनंदिन पेड न्यूजचा अहवाल खर्च समितीला सादर करावा असे सांगितले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीचे कामकाज, इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरातीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थापित करण्यात आलेल्या टी.व्ही, युनिटचे कामकाज, सर्व नोंदी व रिपोर्ट कशा पद्धतीने । पान २ वर

## मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी; अपवादात्मक परिस्थितीत दोन तासांची सवलत

सोलापूर/प्रतिनिधीः निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघाच्या ७ मे २०२४ या मतदानाच्या दिवशी एकही कामगार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी मतदानाच्या दिवशी सर्व कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना भरपगारी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. अपवादात्मक परिस्थितीत ज्या औद्योगिक संस्था, कंपनी बंद ठेवल्याने त्यांचे नुकसान होत असेल, तेथील कामगारांना मतदान करण्यासाठी दोन ते तीन तासांसाठी सुट्टी देणे संबंधितांना बंधनकारक असल्याची माहिती सहाय्यक कामगार आयुक्त सु.म गायकवाड यांनी दिली आहे.

महाराष्ट्र शासनाचे उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय ५ एप्रिल २०२४ अन्वये निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा, यासाठी सर्व दुकाने, आस्थापना, व्यापारी संस्था, हॉटेल, रेस्टारन्ट, नाट्यगृहे, औद्योगिक उपक्रम, कारखाने किंवा इतर व्यापारी आस्थापना यांच्या व्यवस्थापक मालकांना सुट्टी देणे बंधनकारक आहे.

अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन ते तीन तासांची सवलत देता येईल, कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांना घेणे आवश्यक राहील, जिल्ह्यातील कामगारांकरीता सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय स्तरावर दक्षता कक्ष स्थापन करण्यात आले असून कामगारांना मतदानाकरीता सुट्टी अथवा दोन तासांची सवलत आस्थापना मालक देत नसल्यास कार्यालयाचे दुरध्वनी क्र. ०२१७-२७२८४०१ तसेच भ्रमणध्वनी क्र. ९८२२४९४८६५ वर संपर्क साधून तक्रार देण्यात यावी. असे आवाहनही सहायक कामगार आयुक्त श्री. गायकवाड यांनी केले आहे.

## सैन्यदल अधिकारी पदासाठी मोफत पूर्व प्रशिक्षण

सोलापूर/प्रतिनिधीः भारतीय सैन्यदल,नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Service Selecation Board (SSB) या परिक्षेची पूर्व तयारी करून घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व युवतींसाठी दि.२० मे २९ मे २०२४ या कालावधीत SSB कोर्स आयोजित करण्यात येत आहे. या कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची नि:शुल्क सोय करण्यात आली आहे. जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय सोलापूर येथे दि.९ मे रोजी रोजी मुलाखतीस उपस्थित रहावे.

केंद्रामध्ये एस.एस.बी कोर्समध्ये प्रवेश मिळविण्यासाठी आवश्यक पात्रता:- कंम्बाईड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन ( CDSE-UPSE) अथवा नॅशनल डिफेन्स केडमी एक्झामिनेशन (NDAAUPSE) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी उ सर्टिफिकेट - किंवा इ ग्रेड मध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडकॉर्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी.

टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. University Entry Scheme साठी एसएसबी कॉललेटर असावे किंवा एस.एस.बी साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे.

मुलाखतीस येण्यापूर्वी उमेदवारांनी दुरध्वनी किंवा प्रत्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे संपर्क करावा कार्यालयीन दूरध्वनी ०२१७-२९९२३६६ असा आहे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी , छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र.नाशिक रोड नाशिक यांचा ई मेल आयडी training.pctcnashik@gmail.com व दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉटस्अप क्र.९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी , सोलापूर यांनी केले आहे.

## संपादकीय

### लोकशाही यंत्रणा खिळखिळी ..

निवडणूक आयोग आणि आचारसंहिता काय असते, हे टी. एन. शेषन यांनी मुख्य निवडणूक आयुक्त असताना देशातील जनतेला दाखवून दिले. त्यानंतर काही वर्षे आयोगाने त्याच पध्दतीने यंत्रणा राबवली. मात्र, गेल्या दहा वर्षांमध्ये स्वायत्त संस्थांमध्ये केंद्र सरकारचा झालेला हस्तक्षेप आणि सरकारच्या मर्जीने निवडलेले अधिकारी या घटनात्मक संस्थांची एक-एक वीट ढासळत आहेत. लोकसभेची निवडणूक देशाचे भविष्य घडवणारी असल्याने याकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधले आहे. ही निवडणूक निष्पक्ष, निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडली पाहिजे. त्यासाठी दक्ष असलेल्या आयोगाने अनेक हालचालींवर लक्ष ठेवले आहे. मतदारांना पैसे वाटणे, मतदारांवर प्रभाव पडेल असे विधान करणे आणि जाती व धर्माच्या आधारावर मते मागणे, हे निवडणूक आयोगाला मान्य नाही. ते कायद्याच्या कक्षेत बसत नसल्याने आचारसंहितेचा भंग होऊ शकतो. याच कारणावरुन उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेने प्रचारात आणलेले प्रेरणागीत वादात सापडले आहे. 'शंखनाद होऊ दे, रणदुदुंभी वाजू दे, नाद घोष गर्जू दे विशाल' या मशालगीतात एकदा 'जय भवानी' व हिंदू हा शब्द वापरण्यात आला आहे. त्यावर निवडणूक आयोगाने आक्षेप घेऊन जय भवानी व हिंदू शब्द हटवण्यास ठाकरे यांना नोटीस धाडली आहे. जय भवानी आणि जय शिवराय या घोषणा आजच दिल्या जात नाहीत तर त्या अनेक वर्षांपासून दिल्या जातात. त्यामुळे जय भवानी हा शब्द कोणत्याही परिस्थितीत हटवणार नाही. उद्या आयोग 'जय शिवराय' म्हणण्यासही बंदी घालेल, हे कदापि खपवून घेणार नाही. उलट जय बजरंगबलीच्या नावावर मते मागणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपला मत दिल्यास रामलल्लाचे मोफत दर्शन घडवू असे विधान करणारे अमित शहा आणि मतदान यंत्रात कचाकचा बटणे दाबा, पाहिजे तेवढा निधी देऊ असे आमिष दाखवणाऱ्या अजित पवार यांच्यावर अगोदर कारवाई करा, असे खुले आव्हान ठाकरे यांनी आयोगाला दिले आहे. ठाकरे यांनी दिलेले आव्हान स्वीकारुन आयोग मोदी आणि शहा यांना नोटीस बजावून खुलासा मागवेल यावर कुणाचाही विश्र्वास बसणार नाही. मात्र, चौकशी यंत्रणांप्रमाणेच आयोग विरोधकांची मुस्कटदाबी करीत असल्याचे चित्र उभे राहाणे हे लोकशाहीसाठी धोकादायक आहे. सत्ताधारी किंवा विरोधक या दोन्ही पक्षांना आयोगाने सारखीच वागणूक द्यायला हवी. अन्यथा आयोगाच्या निष्पक्षतेला गालबोट लागले तर लोकशाही यंत्रणा खिळखिळी होईल.

# सातारा जिल्ह्यात सेंद्रीय शेतीला गती द्या : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

## पिकपेरणी सुव्यवस्थित व्हावी यासाठी शेतकऱ्यांना हवामान आधारित नियोजन कळवा

सातारा/वृत्तसंस्था : सन २०२४-२५ साठी जिल्ह्यात सेंद्रीय शेती उपक्रम गतीमान करा यासाठी शेतकऱ्यांची निवड करा यावर्षी पर्जन्यमान चांगले होणार आहे. त्यासाठी हवामान आधारित शेतकऱ्यांना पिकपरेणीसाठी नियोजन कळवा. खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना खते, बि-बियाणे, निविष्ठा, यांचा सुरळित पुरवठा व्हावा यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घ्या असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. यावेळी त्यांनी कृषी विभागाने खरीप हंगामाचे सुव्यवस्थीत नियोजन केल्याचे सांगितले.

सन २०२४-२५ खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, विभागीय कृषी सहसंचालक बसवराज बिराजदार, जिल्हा कृषि अधिक्षक भाग्यश्री फरांदे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता अरुण नाईक, जिल्हा नियोजन अधिकारी शंकर माळी, नाबार्डचे प्रकल्प संचालक राजेंद्र चौधरी, जिल्हा परिषदेचे कृषि अधिकारी विजय माईनकर, प्रकल्प संचालक आत्मा विकास बंडगर, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक योगेश पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) विजया यादव, यांच्यासह कृषि व कृषि संलग्न विभागाचे अधिकारी/ प्रतिनिधी तसेच, बँकाचे, विमा कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले, सातारा जिल्ह्यात एकूण खरीप लागवडीखालील क्षेत्र सर्वसाधारण चालू खरीप हंगामात ३लाख ८६ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी सर्वसाधारणत: ९८ हजार हेक्टर क्षेत्र हे ऊस लागवडीखालील आहे. यावर्षीही खरीप हंगामासाठी दर्जेदार खते बी बियाणे व निविष्ठा यांचा पुरवठा करा. जिल्ह्यात नैसर्गिक सेद्रीय शेती, उपक्रम अधिकाधिक गतिमान करा त्यासाठी शेतकऱ्यांची निवड करा. मृद परिक्षण उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवून शेतकऱ्यांना त्यानुसार कोणती पिके घ्यावीत यासाठी मार्गदर्शन करा. यावर्षी पर्जन्यमान चांगले होणार असून फळबाग लागवड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर व्हावी यासाठी नियोजन करा. शेततळ्यांची मागणी करणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला शेततळ्याची उपलब्धतता करुन देता यावी यासाठी यंत्रणेने आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत. कृषी विभागांनी नाविण्यपूर्ण उपक्रमांसाठी जूनच्या पहिल्या आठवड्यात प्रस्ताव सादर करावेत व निधी मागणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले.

खरीप हंगाम सन २०२४-२५ साठी सुक्ष्म नियोजन करण्यात आले असून त्यासाठी महाबीजकडून ९ हजार ३६५ क्विंटल व खाजगी ३५ हजार ४३० क्विंटल अशा एकूण ४४ हजार ७९५ क्विंटल बियाणांची मागणी करण्यात आली आहे. यावर्षीसाठी एकूण १ लाख ९ हजार ५०० मॅट्रीक टन खतांची मागणी करण्यात आली आहे. त्यामध्ये युरिया ३७ हजार ७०० मे. टन, डीएपी १० हजार मे. टन, एसएसपी ११ हजार ७०० मे. टन, एमओपी ४ हजार १०० मे. टन, आणि एकूण संयुक्त ४६ हजार मे. टन अशी खतांची मागणी करण्यात आली आहे. जिल्ह्यात १ लाख ९ हजार ५०० मे. टन आवंटन मंजूर आहे.

शेतकऱ्यांना उच्चतम गुणवत्तेच्या कृषि निविष्ठा मिळाव्यात आणि कमी गुणवत्तेच्या कृषि निविष्ठा विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कार्यवाही करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले. सातारा जिल्ह्यात बियाणांचे १२६३, खतांचे १४७९, आणि किटकनाशकांचे ११८८ विक्रेते आहेत. तसेच बियाणांचे ३, खतांचे ३३ किटकनाशकांचे ७ उत्पादक आहेत. सन २०२३-२४ मध्ये २५ विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर १० विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत अशी माहिती बैठकीत देण्यात आली. शेतकऱ्यांना बियाणे खते व किटकनाशके दर्जेदार व योग्य भावात उपलब्ध होण्यासाठी जिल्ह्यात १ पूर्णवेळ व अर्धवेळ गुणनियंत्रण निरीक्षकांद्वारे निविष्ठा तपासणीचे नियोजन करण्यात आले आहे.



सातारा जिल्ह्यामध्ये कृषि निविष्ठाबाबत कोणतीही तक्रार असल्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षात सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत शेतकऱ्यांनी संपर्क साधावा, या कक्षाचा संपर्क क्रमांक ७४९८९२१२८४ असा आहे.

सन २०२४-२५ साठी खरीप पिक कर्ज वितरणाचे उद्दिष्ट १ हजार ३८२ कोटीचे असून शेतकऱ्यांना सुलभ व विहित मुदतीत पिक कर्ज उपलब्ध करुन देण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले.

सातारा जिल्ह्यामध्ये रासायनिक खतांच्या होत असलेल्या वापरामध्ये पुढील ५ वर्षात १० टक्के कपात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रचार, प्रसिद्धी करण्यात येत आहे. यामध्ये ऊस पिकामध्ये ऊस पाचट व्यवस्थापन अभियान, नर्सरीतील ऊस रोपांद्वारे लागवड, हिरवळीच्या, जैविक, सेंद्रीय खतांचा वापर यावर भर देण्यात येत आहे. अंतर पिकांचा समावेश, पिकांचा फेरपालट, नॅनो युरिया, व नॅनो डीएपी खतांचा वापर याबाबतही शेतकऱ्यांना जागृत करण्यात येत आहे.

जिल्ह्यात पंतप्रधान फसल विमा योजनेत खरीप हंगाम २०२३ मध्ये २ लाख ४७ हजार ३७६ शेतकऱ्यांनी भाग घेतला होता. त्यापैकी आतापर्यंत २० हजार ६६ शेतकऱ्यांना ४ कोटी ३८ लाख ६७ हजार रुपये नुकसान भरपाईची रक्कम देण्यात आली आहे. तर ५४ कोटी १ लाख रुपयांची रक्कम प्राप्त झाली असून वाटप करण्याचे नियोजन सुरू आहे.

जिल्ह्यात नाविण्यपूर्ण उपक्रमांमध्ये कृषि विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या समन्वयाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजनेअंतर्गत बांबू लागवड हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना खंडित कालावधीमधील ३१ मार्च २०२४ अखेर ३०० प्रस्ताव मंजूर असून त्यापोटी ५ कोटी ९३ लाख अनुदान वितरीत करण्यात आले आहे. उर्वरित ६० प्रस्ताव आयुक्तालय स्तरावर प्रलंबित असून त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत २८० विमादावे प्राप्त झाले असून यातील ११ दावे नामंजूर आहेत. तर ६० दावे कागदपत्राअभावी प्रलंबित आहेत. ११ दावे कार्यवाहीत आहे. कृषि आयुक्तालयाकडून २ कोटी ४३ लाख रुपयांचा निधी आतापर्यंत वितरीत करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील पिकांची उत्पादकता वाढावी व शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उचंवावा यासाठी कृषि विभाग प्रयत्नशील असून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कृषि यांत्रिकीकरण, कोरडवाहू क्षेत्र विकास, क्रॉपसॅप, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, मुख्यमंत्री शाश्र्वत अभियान, कृषि सिंचन योजना अंतर्गत वैयक्ति शेततळे, बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय परिवर्तन योजना, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग, मुख्यमंत्री शाश्र्वत सिंचन योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, यासारख्या सर्व महत्वपूर्ण योजना कृषि विभागामार्फत राबविण्यात येतात.

पान १ वरुन

### ८८ मतदारसंघांत ६४.३५..

तृणमूल काँग्रेसने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तात्काळ हस्तक्षेपाची मागणी केली. मणिपूरमध्ये मतदानकेंद्रावर काही समजाकंटकांनी गोंधळ घालून मतदान बंद पाडण्याचा प्रयत्न केला.

या फेरीतील प्रमुख उमेदवारांमध्ये काँग्रेसचे राहुल गांधी, के. सी. वेणुगोपाल, भूपेश बघेल, शशी थरूर, डी. के. सुरेश, वैभव गेहलोत, भाजपचे केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर, व्ही. मुरलीधरन, अभिनेत्री हेमा मालिनी, अरुण गोविल, तेजस्वी सूर्या, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, जनता दलाचे नेते एच. डी. कुमारस्वामी आदींचा समावेश आहे.हेही वाचा स्पायडरमॅनच्या वेशात टायटॅनिकची पोज! 'त्या' स्टंटमुळे जोडप्याची थेट तुरुंगात रवानगी, व्हायरल तखऊएज मध्ये नेमकं काय?

### मोदी, राहुल यांच्या विधानांबाबत ..

आणि विशेषत: प्रमुख प्रचारकांच्या वर्तनाची जबाबदारी घ्यावी लागेल', असेही म्हटले आहे. लोकप्रतिनिधी कायद्याच्या अनुच्छेद ७७ नुसार, मोदी व गांधी यांचा त्यांच्या पक्षांनी प्रमुख प्रचारकांच्या यादीत समावेश केला आहे. पक्षाने त्यांच्या भाषणांवर देखरेख ठेवणे अपेक्षित असल्याने पक्षप्रमुखांना नोटीस बजावण्यात आल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी भाजपचे पश्र्चिम बंगालमधील नेते दिलीप घोष यांनी 'तृणमूल काँग्रेस'च्या सर्वेसर्वा व राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याबद्दल तर, काँग्रेसचे महासचिव रणदीप सुरजेवाला यांनी भाजप उमेदवार हेमा मालिनी यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधाने केली होती. काँग्रेसच्या समाजमाध्यम विभाग प्रमुख सुप्रिया श्रीनेत यांच्या 'एक्स' हॅण्डलवरून भाजपच्या हिमाचल प्रदेशमधील मंडी मतदारसंघातील उमेदवार व अभिनेत्री कंगना राणौत यांच्यावर आक्षेपार्ह टिप्पणी केली गेली. या तीनही प्रकरणी आयोगाने थेट नेत्यांना नोटीस बजावली होती. मात्र, मोदी व गांधी यांच्या संदर्भातील फक्त पक्षाध्यक्षांना नोटिसा बजावण्यात आल्याबद्दल आश्र्चर्य व्यक्त होत आहे.

राजस्थानच्या बांसवाडामधील प्रचारसभेत मोदींनी, केंद्रात काँग्रेसला सत्ता मिळाली तर हिंदूंच्या संपत्तीचे फेरवाटप करून ती मुस्लिमांना दिली जाईल, असा दावा केला होता. काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर स्वातंत्र्यपूर्व काळातील मुस्लीम लीगच्या विचारांची छाप असून देशाच्या विभाजनाची योजना आखली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला होता. याविरोधात काँग्रेसने तक्रार दाखल केली आहे.

केरळमधील कोट्टयममधील प्रचारसभेत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी 'एक देश, एक भाषा, एक धर्म' यासाठी मोदी प्रयत्नशील असल्याचे म्हटले होते. तसेच करेईबतूरमध्ये झालेल्या सभेत आपली भाषा, इतिहास व संस्कृतीवर पंतप्रधान हल्ला करीत असल्याचे विधान गांधी यांनी केले होते. त्यावरून उत्तर व दक्षिण भारतात दुही निर्माण करणारी भाषा राहुल करीत असल्याची तक्रार भाजपने केली आहे.

### आबा कांबळे खून खटल्यात ..

साली शिवजयंती मिरवणुकीत धक्का लागल्याच्या क्षुल्लक कारणावरून भांडण झाले होते. त्यातूनच पाणीवेशीतील सुरेश ऊर्फ गामा पैलवान याचा मुलगा ऋतुराज याचा खून झाला होता. त्या खटल्यात पत्रा तालमीच्या सत्यवान ऊर्फ आबा कांबळे याच्यासह दहाजणांना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. परंतु २०१४ साली मुंबई उच्च न्यायालयात अपिलामध्ये सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाली होती. त्यामुळे गामा पैलवान व त्याचै साथीदार चिडले होते. मृत आबा कांबळे हा डाळिंबी आडजवळ मोबाईल गल्लीत मोबाईल विक्री आणि दुरुस्तीचा व्यवसाय करीत होता. ७ जुलै २०१८ रोजी तुरळक पाऊस पडत असताना आबा कांबळे हा दुकानाजवळ आडोशाला थांबला असताना दुचाकी गाड्या उडवत आलेल्या आरोपींनी आबा कांबळे याच्यावर कोयत्यांनी हल्ला केला. तेव्हा जीव वाचविण्यासाठी तो पळत असताना पाठलाग करून त्याच्यावर सपासप ५६ वार करण्यात आले.

ही सर्व थरारक घटना तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाली होती. मृत कांबळे याचे रक्ताने माखलेले कपडे, गुन्ह्यात वापरलेल्या कोयत्यावरील रक्ताचे डाग तपासले असता ते मिळतेजुळते निघाले. सीसीटीव्ही फुटेजचा अस्सलपणा पुढे आला. या खटल्यात २८ साक्षीदार तपासले गेले. यात फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक संजय जगताप, तत्कालीन सहायक पोलीस आयुक्त डॉ. दीपाली काळे, फिर्यादी शुभम धुळराव तसेच वैद्यकीय आणि रासायनिक पृथःकरणाशी संबंधित तज्ज्ञ अधिकाऱ्यांची साक्ष महत्वाची ठरली. सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत तर आरोपींतर्फे ॲड. श्रीकांत जाधव, ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. झुरळे यांनी काम पाहिले.

### जिल्हास्तरीय माध्यम प्रामाणिकरण..

दिला जातो याविषयी जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के यांनी तसेच सोशल मीडियाविषयी सविस्तर माहिती सदस्य डॉ.श्रीराम राऊत व सोशल मीडियाचे समन्वयक तंबाके यांनी दिली. यावेळी माध्यम कक्षातील राजेंद्र तारवाले , शरद नलावडे, दिलीप कोकाटे, संजय घोडके, व्ही.एस.बिराजदार, एल.आर.बोमेन, के.ए.जमादार, ए.व्ही.अणची, आर.एस.शेख आदी उपस्थित होते.

# जिममध्ये जास्त वेळ व्यायाम करणाऱ्यांना असतो हा धोका

असंख्यजण आपल्या फिटनेसला घेऊन नेहमी चिंतेत असतात. खाण्याच्या अयोग्य वेळा, कामाचा ताण अशा अनेक गोष्टींमुळे शरीराकडे दुर्लक्ष होत असतं. आकर्षक फिटनेस आणि शरीर स्वास्थ्यासाठी व्यायामशाळेत जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. व्यायामाचा शरीरावर त्वरीत परिणाम दिसावा यासाठी जास्त वेळ, जास्त वजन उचलण्याची चूक अनेकजण करतात. यातून उद्भवणाऱ्या धोक्यांबद्दल आपण जाणून घेऊया...

**९० मिनिटं व्यायाम** नुकत्याच झालेल्या एका संशोधनानुसार, ९० मिनिटांपेक्षा जास्त वेळ व्यायाम करणं धोकादायक ठरू शकतं. किती वेळ व्यायाम करायचा हे तुमच्या शारिरीक क्षमतेवरुन ठरतं. सर्वसाधारण शरीरयष्टी असलेल्यांनी आठवड्यातून ४ ते ५ दिवस व्यायाम करायला हवा. व्यायाम करताना मसल्सवर आलेला प्रेशर २ ते ३ दिवसांत रिलीज होतो. जर तुम्ही खूपचं वजनदार असाल तरी शारिरीक क्षमता समजून घेऊन व्यायाम करा.

ज्या दिवशी तुम्ही व्यायाम करणार नसाल तेव्हा तुम्ही जॉगिंग किंवा वॉकिंग करू शकता. याशिवाय योगासन आणि प्राणायमदेखील चांगला पर्याय आहे. तुमच्या शरीरात ताकद असेल तर नक्कीच जास्त वेळ व्यायाम करु शकाल. शारीरीक विज्ञानानुसार ९० मिनिटांपेक्षा जास्त वेळ व्यायाम करू नये. ९० मिनिटांनंतर १५ ते २० मिनिटांचा ब्रेक घ्या आणि पुन्हा व्यायामाला सुरूवात करा. व्यायाम करताना पाणी पिणंही महत्त्वाचं आहे.



मानसिक स्वास्थावर परिणाम

जिममध्ये जास्त घाम गाळल्यास तुमच्या शरीरावर परिणाम होईल किंवा नाही होणार पण तुमचं मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. एका संशोधनानुसार जास्त वेळ व्यायाम केल्यास मानसिक संतुलन बिघडत. यामुळे विचार करणं, समजून घेणं किंवा मतं मांडण्याची क्षमता कमी होते.

# इथेनॉल निर्मितीला केंद्राची परवानगी

नवी दिल्ली : केंद्र सरकारने देशभरातील साखर कारखान्यांना बी हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल बनविण्यास बंदी घातली होती. दरम्यान, साखर कारखान्यांना दिलासा केंद्र सरकारकडून मिळाला आहे. अन्न मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार सरकारने साखर कारखान्यांना चालू वर्षात इथेनॉल उत्पादनासाठी ६.७ लाख टन बी हेवी मोलॅसिस वापरण्याची परवानगी दिली आहे.

डिसेंबर २०२३ मध्ये केंद्र शासनाने घेतलेल्या आढाव्यामध्ये देशातील साखरेची उपलब्धता कमी राहण्याचा अंदाज होता. या पार्श्वभूमीवर ऐन निवडणुकीच्या तोंडावर स्थानिक बाजारातील साखरेच्या दरात अवाजवी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला होता. त्यानुसार केंद्र शासनाने ७ डिसेंबर २०२३ च्या आदेशाद्वारे उसाचा रस तसेच बी हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल निर्मितीस तातडीने बंदी आणली होती. ७०० कोटींची मळी होती पडून डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारीत झालेल्या परतीच्या पावसाने महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, तमिळनाडू या राज्यांमधील उसाला फायदा होऊन पूर्वीच्या अंदाजापेक्षा २० ते २५ लाख टनांनी साखरेची उपलब्धता वाढली. सुधारित वाढीव साखर उपलब्धतेची आकडेवारी आणि त्या आधारे देशभरातील कारखान्यांच्या आसवनी प्रकल्पांमध्ये शिल्लक राहिलेल्या सुमारे ७ लाख टन बी हेवी मळीचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी करण्याबाबत महासंघाने केंद्र सरकारला दिले. या मळीची किंमत सुमारे ७०० कोटी रुपये आहे. बंदीमुळे या मळीचा वापर करता येत नव्हता पर्यायाने कारखाने अडचणीत आले होते. पण या निर्णयामुळे कारखान्यांना दिलासा मिळाला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पवार व मोहिते यांनी मा आमदार जगताप यांची घेतली भेट

करमाळा/प्रतिनिधीः लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर आज करमाळा येथे देशाचे नेते शरद पवार यांची जाहीर सभा होती त्यापूर्वी पवार व जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील यांनी मा आमदार जयवंतराव जगताप यांची भेट घेतली या भेटीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली या भेटी ने करमाळा तालुक्यात चर्चाला उधाण आले यावेळी मा आमदार जयवंतराव जगताप यांनी शरद पवार व जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील यांचा सन्मान केला या भेटी नंतर पवार व मोहिते हे माढा लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारार्थ व मा आमदार नारायण पाटील यांचा पक्ष प्रवेश केला

## अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान ३० तारखेला धाराशिव मध्ये



धाराशिव : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर प्रचाराला आता प्रचंड जोर येऊ लागला आहे. महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी धाराशिव शहरात प्रचार सभा घेणार आहेत. मंगळवार ३० एप्रिल रोजी त्यांची प्रचार सभा होणार असून या सभेसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार उपस्थित राहणार आहेत. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर विरुद्ध महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई जगजीतसिंह पाटील यांच्यामध्ये शिवसेनेच्या तसेच काँग्रेसच्या नेत्यांच्या सभा सुरू आहेत. तर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचीही सभा होण्याची शक्यता आहे.

## यूएसए, उटाह येथील ब्रिघम यंग युनिव्हर्सिटी (बीवाययू) तर्फे विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड यांना मानद डी.लिट.प्रदान




पुणे : शिक्षण आणि मानवतेच्या दीर्घकाळ समर्पित सेवेसाठी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्र्वधर्मी प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांना यूएसए, उटाह येथील ब्रिघम यंग युनिव्हर्सिटीतर्फे (बीवाययू) मानद डी.लिट. पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

बीवाययूचा २०२४ बॅचच्या दीक्षांत समारोह गुरूवारी २५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी बीवाययूचे अध्यक्ष डॉ. सी.शेन रीस, एल्डर डी टॉड क्रिस्टोफरसन, एल्डर रोनाल्ड रासबँड, एल्डर गेरिट गाँग, रॉन गनेल, रिचर्ड नेल्सन, किंग हुसेन, डॉ. अशोक जोशी आणि बोर्डाचे इतर विश्र्वस्त सदस्य उपस्थित होते. डीलिट पदवी प्रदान करताना अध्यक्ष सी शेन रीस यांनी प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग कार्याचे कौतूक केले. तसेच आंतरधर्मीय संवादातून विश्र्वशांती स्थापनेला देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचाचे कौतुक केले.

डीलिट स्वीकारल्यानंतर विश्र्वधर्मी प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड म्हणाले, शिक्षणात वैश्र्विक मूल्याधिष्ठीत शिक्षणाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे. त्यातूनच वसुधैव कुटुम्ब कम आणि विश्र्वशांतीचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. मन, बुद्धी, आत्मा आणि शरीर हे निसर्ग तत्व आहे. आज शरीर आणि बुद्धी यावर सखोल संशोधन होत आहे. परंतू आत्मा आणि मनाच्या शिक्षणाचा विचार झालेला दिसत नाही. जगात शांती नांदायची असेल तर अध्यात्माबरोबरच मन आणि आत्म्याचा अभ्यास होणे गरजचे आहे.

अमेरिकेतील आघाडीचे विद्यापीठ बीवायू व एमआयटी डब्ल्यूपीयू यांच्यात सहकार्य निर्माण व्हावे, तसेच जगात शांती संस्कृती प्रस्थापित करण्यासाठी मूल्याधारित शिक्षण प्रणालीच्या संकल्पनेला चालना देण्यासाठी जगातील इतर विद्यापीठांचाही समावेश होईल. अशी डॉ. कराड यांनी आशा आहे.माझ्या जीवनावर महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्र्वर आणि संत तुकाराम यासारख्या थोर तत्वज्ञ संताचा आणि डॉ. अल्बर्ट आइनस्टाईन सारख्या शास्त्रज्ञांचा चिरस्थायी प्रभाव पडला आहे. माझी मोठी बहिण प्रयागअक्का कराड यांचा ही प्रभाव आहे. त्याच प्रमाणे स्वामी विवेकानंद यांच्याकडून मिळालेल्या प्रेरणेमुळे जीवनाला नवी दिशा मिळाली आहे. असे उद्गार डॉ. विश्र्वनाथ कराड यांनी या प्रसंगी काढले.

या समारंभात बीवायूच्या १५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये विविध विषयातील पदवी पदव्युत्तर आणि डॉक्टरेट पदव्यांचा समावेश होता. या दीक्षांत समारोहात सुमारे २५ हजार नागरिक उपस्थित होते.

## मैत्रकुलच्या किशोर जगतापचा दुसरा जामीन अर्जही भिवंडी न्यायालयाने फेटाळला

भिवंडी/प्रतिनिधीः भिवंडी मधील बापगाव मध्ये असलेल्या मैत्रकुलच्या संस्थापक किशोर जगताप वर पॉक्सो अंतर्गत पडघा पोलिस ठाण्यात डिसेंबर २०२३ मध्ये गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान किशोर जगताप अनेक महिने फरार होता. फरार असताना त्याने अटकपूर्व जामीनासाठी भिवंडी न्यायालयात अर्ज केला होता. परंतु प्रकरण गंभीर असल्याने आणि इतर अल्पवयीन पीडित तरुणींनी ही पुढे येऊन जबाब नोंदवल्यामुळे त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आला होता. तर किशोर जगताप यांचा दुसरा जामीन अर्जही भिवंडी न्यायालयाने फेटाळला आहे. १४ मार्च २०२४ रोजी किशोर जगताप स्वतः पडघा पोलिस ठाण्यात हजर झाला. जे त्याने फेसबुक पोस्टद्वारे ही जाहीर केले होते. किशोर जगताप स्वतःहुन इतक्या महिन्यांनी पोलिस ठाण्यात हजर झाल्यानंतर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता त्याच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यातील कलमांमध्ये ही पोलीसांनी वाढ केली आहे. इतर पॉक्सो कलमांसोबतच ३७६ कलम ही त्याच्यावर लावण्यात आले आहे. त्याचबरोबर ज्या महिला साथीदाराच्या चौकशी नंतर किशोर जगताप पोलिसांसमोर हजर झाला. तर फिर्यादीच्या जबाबावरून गुन्ह्यात एक सहआरोपी सुद्धा करण्यात आले आहे. किशोर जगताप १८ मार्च पासून कल्याणच्या आधारवाडी तुरूंगात आहे. तिथे त्याची प्रकृती बरी नसल्याने दुसरा जामीन अर्ज भिवंडी न्यायालयात केला होता. दरम्यानच्या काळात जगतापचे साथीदार पीडित तरुणी राहत असलेल्या विभागात त्यांचे नाव उघड करत होते. फेसबुकच्या माध्यमातून ही तरूणींना मानसिक त्रास देत होते. त्यावेळी तरुणींनी स्थानिक पोलिस ठाण्यात ही अर्ज दिला होता. किशोर जगताप व साथीदारांनी सुरू केलेल्या मैत्रकुलकडे अल्पवयीन मुलं मुली निवासी स्वरूपात ठेवण्याचा कोणताही अधिकृत परवाना नव्हता. त्यामुळे न्यायालयात युक्तिवाद होते वेळी पिडीत तरुणींनी हा संघटीत गुन्हेगारीचा प्रकार असल्याचे ही न्यायाधीश पी. एम .गुप्ता यांच्यासमोर सांगितले. त्यामुळे संस्थेचे अधिकृत पदाधिकारीही अडचणीत येण्याची शक्यता आहे. महिला बालविकास विभागाकडेही काहीजणांनी पत्रामार्फत मैत्रकुलबद्दल विचारणा केली आहे. सदर पुढील तपास पडघा पोलीस स्टेशन करीत आहे. तर मैत्रकुल प्रकरण कशाप्रकारे वळण घेत जाते याकडे कल्याण , भिवंडी मधील अनेक सामान्य नागरिक व सामाजिक कार्यकर्ते यांचेही लक्ष लागलेले आहे.

## फुलचिंचोली येथे कायदेविषयक शिबीर संपन्न

### जागतिक पाणी दिवस व जागतिक वसुंधरा दिना निमित्त जनजागृती




पंढरपूर/प्रतिनिधीः राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या किमान समान शिबीर कार्यक्रमा अंतर्गत तालुका विधी सेवा समिती पंढरपूर व पंढरपूर अधिवक्ता संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, फुलचिंचोली, येथे. तालुका विधीसेवा समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांच्या मार्गदर्शनाखाली व दिवाणी न्यायाधीश श्रीमती. पी. बी. घोरपडे यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक पाणी दिवस व जागतिक वसुंधरा दिन विषयी जनजागृतीपर कार्यक्रम तसेच कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले.

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष न्यायाधीश श्रीमती. पी. बी. घोरपडे यांनी शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनां पिण्याच्या पाण्याचे महत्व पटवून दिले, तसेच पर्यावणाविषयी जनजागृती करुन, त्याबाबत आमलात आलेले कायदे विषयक मार्गदर्शन केले. तसेच वसुंधरा दिना निमित्त प्रत्येक विद्यार्थी किमान दोन झाडे लावावी असे आवाहनही केले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ड. अर्जुन पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड. राहुल बोडके व आभार उपाध्यक्ष ड शशिकांत घाडगे यांनी मानले. सदर कार्यक्रमास सह सचिव ॲड. शक्तीमान माने, ॲड.व्ही. एम. सरवळे, ॲड. सागर गायकवाड, गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, शाळेचे मख्याध्यापक तुकाराम कांबळे तसेच न्यायालयीन कर्मचारी के.के.शेख, बी.एस.गोरटयाल, विवेक कणकी, तसेच संबधित शाळेचे शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

## उल्हासनगर महानगरालिका शाळांचे शिक्षक प्रतिनिधी यांना पर्यावरण दुत म्हणून घोषित



उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे :उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजी पर्यावरणविषयक जनजागृतीकरीता महापालिका कार्यक्षेत्रातील शाळांचे शिक्षक प्रतिनिधी यांना पर्यावरण दुत म्हणून घोषित करण्यात आले.

आपले शहर स्वच्छ, सुंदर व प्रदुषणमुक्त व्हावे यासाठी नागरीकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त, अजीज शेख, अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, उपायुक्त (पर्यावरण) डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका मुख्यालयातील महासभा सभागृहामध्ये महापालिका शाळांतील शिक्षक प्रतिनिधी यांचेकरीता प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. त्यामध्ये शिक्षकांमार्फत शाळांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांमध्ये शालेय अभ्यासक्रमातील विविध कृतीमधुन पर्यावरणाविषयी जनजागृतीचे धडे देता येतील. त्याचप्रमाणे शिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांचे पालक, पालकांमार्फत त्यांचे आप्तेष्ट, शेजारी अशाप्रकारे मोठया प्रमाणात शहरातील नागरीकांमध्ये जनजागृती होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शिक्षक हे पर्यावरण दुत म्हणून महत्वाचा घटक मानला असुन त्यांना उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान ३७ शिक्षकांना पर्यावरण दूत म्हणून घोषित करुन प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले आहे.सदर प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये उपस्थितांना डॉ. सिमा कांबळे, प्राचार्य, डी.डी. विस्युते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नविन पनवेल यांनी मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाचे नियोजन पर्यावरण विभागामार्फत नियुक्त मे. इन्फिनिटी रिलेशन्स, पनवेल या संस्थेमार्फत करण्यात आले होते. तथापि, सदर कार्यक्रमासाठी पर्यावरण विभागप्रमुख श्रीम. विशाखा सावंत, तसेच जनसंपर्क अधिकारी, श्रीम. छाया डांगळे या देखील उपस्थित होते

## पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशात अतिशय महत्त्वपूर्ण कामे झालेली : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

नातेपुते/प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशात अतिशय महत्त्वपूर्ण कामे झालेली आहेत. त्यामध्ये महिलांसाठी शौचालय, गॅस, मोफत रेशन, पाच लाखांपर्यंत मोफत औषधोपचार आणि प्रत्येक घरात नळाद्वारे शुद्ध पाणी, महिलांना बसमध्ये पन्नास टक्के सवलत, मुलींना शालेय फी माफ इत्यादी कामे केल्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत फक्त आणि फक्त मोदींसाठी प्रत्येकाने मतदान करावे, असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.नातेपुते येथील चैतन्य मंगल कार्यालयात भारतीय जनता पक्ष व सर्व मित्र पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी मनसेचे अप्पासाहेब कर्चे, शिवसेना शिंदे गटाचे सतीश सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सुरेश पालवे,

अक्षय भांड, रमेश पाटील, के. के. पाटील इत्यादींनी मार्गदर्शन केले. पाटील म्हणाले, जगात सर्वात मोठा देश भारत असून लोकशाही मानणारा हा देश आहे. आपणास अनेक क्रांतिकारक निर्णय घेण्यासाठी भक्कम सरकारची गरज आहे.



गेल्या दहा वर्षात देशात एकही दंगल, बॉम्बस्फोट झाला का? प्रत्येक जागा महत्त्वाची आहे. ही लढत मोहिते पाटील विरुद्ध नाईक निंबाळकर अशी नसून ही देशाच्या अस्मितेची लढत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे त्रिदेव प्रत्येकाचा हिशेब घेण्यास खंबीर आहेत.

ते कुणाचा हिशेब शिल्लक ठेवणार नाहीत. यावेळी अप्पासाहेब कर्चे यांनी जोरदार भाषण करून वास्तव सर्वांसमोर मांडले. बाळासाहेब सरगर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी मंचावर सोपानराव नारनवर, भानुदास राऊत, राजकुमार पाटील, सुरेश पालवे, बाजीराव काटकर, जयकुमार शिंदे, हणमंत सुळ, हनुमंतराव ढालपे, विजयकुमार उराडे, दादासाहेब उराडे, रमेश पाटील, प्रवीण काळे, देविदास चांगण, राहुल पद्मन, गणेश पागे, सुधीर काळे, संजय देशमुख, शशी कल्याणी, मित्र पक्षांचे पदाधिकारी, ग्रामीण भागातील कार्यकर्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

के के पाटील म्हणाले, दोन-दोन पिढ्या संघर्ष केला आहे. मार खाल्ला आहे. शेतीवर बोजा चढवलेला आहे. कृष्णा-भीमा स्थिरीकरणासाठी मोहिते पाटील भाजपमध्ये गेलेले नव्हते. तर ते स्वतःला स्थिर करण्यासाठी गेले होते. तुमच्या अडचणी सोडवायला तुम्ही आला होता. तुम्हाला आमदार केले, बंद पडलेला सदाशिवनगर साखर कारखाना सुरू करून दिला. तरीही तुम्ही फसवणूक केली आहे. पण लोक आता जागृत झाले आहेत. त्यामुळे कोणाला गृहीत धरू नका, असा सल्लाही त्यांनी दिली.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींना साथ देण्यासाठी घड्याळाला मत देवून विजयी करा : सुनेत्रा पवार

इंदापूर/प्रतिनिधीः राष्ट्र उभारणीच्या पवित्र कार्यात सतत प्रयत्नशील असणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना समर्थ साथ देण्यासाठी 'घड्याळा'ला मत देऊन आपणास विजयी करावे असे आवाहन बारामती लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी केले.



शहरातील डॉ. आंबेडकरनगरमध्ये झालेल्या प्रचार सभेत त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण माने उपस्थित होते. सुनेत्रा पवार म्हणाल्या की, देश कोणाच्या हातात द्यायचा याची ही निवडणूक आहे. ही कुठल्याही कुटुंबातील निवडणूक नाही किंवा नात्यातील निवडणूक नाही. नरेंद्र मोदी व राहुल गांधी यांच्यातील निवडणूक आहे. भारताला उत्तम स्थानावर नेण्यासाठी मोदींनी कणखर भूमिका घेतलेली आहे. जनकल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवलेल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवारांचा काम करण्याचा धडाका सर्वांना परिचित आहे. काम करताना ते कोणतेही राजकारण करत नाहीत. व्यक्ती कोणत्या जाती-धर्माचा, पक्षाचा न बघता माझा माणूस आहे या भावनेतून ते काम करतात. केंद्र व राज्यात सम विचारी लोक असतील तर शासनाच्या योजना सर्वस्तरात पोहोचतात. लोकांच्या अडीअडचणी सुटण्यास मदत होते. यामुळे घड्याळास मतदान करण्याचे आवाहन पवार यांनी केले. यावेळी धनंजय बाब्रस, श्रीधर बाब्रस, विठ्ठल ननवरे, शेखर पाटील, शिवाजीराव मखरे यांची भाषणे झाली. नगरसेविका राजश्री मखरे यांनी प्रास्ताविक केले.

# मतदार मलाच निवडून देणार: आ.प्रणिती शिंदे



पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा मतदारसंघातून मतदारांनी निवडणुकीच्या अगोदर ठरवलेले आहे भाजपला पराभूत करायचं असे सोलापूर जिल्ह्यातील असंख्य तालुक्यातील जनता आणि शेतकरी कष्टकरी बेरोजगार आम्हालाही आवर्जून सांगितले की आम्ही अगोदर ठरवलेला आहे लोकसभा निवडणुकीत भाजपला पराभूत करायचं म्हणून असे वक्तव्य आज पंढरपूर येथे म्हाडा लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार पुण्यति शिंदे यांच्या प्रचारक पंढरपूर येथे शिवतर चव्हाण झालेल्या जाहीर सभेमध्ये प्रणिती शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले की भाजप सरकारने सर्वसामान्य जनता शेतकरी कष्टकरी यांना महागाईच्या आणि संकटाच्या घरी मध्ये त्यांना ढकलून दिलेला आहे सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे आज पर्यंत दहा वर्षांमध्ये दोन लोकप्रतिनिधी भाजपने दिली ते काही कामाचे असे नसलेले दोन खासदार आपल्या माती मारलेली आता तिसरा कोपरा म्हणून आलेला हा उमेदवार भाजपने दिलेला आहे सोलापूर लोकसभा मतदारसंघातील असंख्य अडचणी समस्या सोलापूर जिल्ह्यातील असलेल्या भेडसावणारा प्रश्न म्हणजे पाणी प्रश्न बेरोजगाराचा प्रश्न यंत्र उद्योग उद्योजकांना प्रश्न कामगारांचे प्रश्न अशा असंख्य प्रश्न ही ज्वलंत असताना भाजपच्या दोन्ही खासदारांनी दहा वर्षांमध्ये संसदेमध्ये आवाज उठवला नाही असे मुके असणाऱ्या खासदारांना आपण दहा वर्षे निवडून दिले त्यांनी दहा वर्षे सत्तेची माझ्या लुटले आता अशी चूक पुन्हा करू नका सोलापूर जिल्ह्यातील भेडसावणारा पाणी प्रश्न बेद्वारांचा प्रश्न सर्वसामान्य महिलेचा प्रश्न अशा अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी मला सोलापूर लोकसभा मतदारसंघातून आणि माढा लोकसभा मतदारसंघातून तून दर्शन मोहिते पाटील यांना आपण निवडून द्यावे असे आव्हाने पुण्यति शिंदे यांनी आज रोजी जाहीर सभेत केली

# सोलापूर हायफ्लायर्स राऊंड टेबल ३०९ कडून चार वर्ग खोल्यांचे लोकार्पण

सोलापूर/प्रतिनिधीः ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. आर्थिक परिस्थिती हालाखीची असली तरी मुलांनी शिक्षण घेऊन मोठा साहेब व्हावा अशी आई-वडिलांची इच्छा असते. मुले शिकली तर घरची परिस्थिती सुधारेल या भावनेतून मुलांना शिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठविले जाते. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते प्रत्येकाने पिले पाहिजे. गोर, गरीब, तळागाळातील मुलांना दर्जेदार शालेय शिक्षण घेताना अडचणी येऊ नयेत या भावनेतून मोहोळ तालुक्यातील पेनुर गावातील आर. आर. पाटील हायस्कूलला ४ वर्गखोल्या बांधून देण्यात आले असल्याचे सोलापूर हायफ्लायर्स राऊंड टेबल ३०९ चे चेअरमन रोहित राही म्हणाले.

ते सोलापूर हायफ्लायर्स राऊंड टेबल ३०९ या संस्थेकडून आर. आर. पाटील हायस्कूला बांधून देण्यात आलेल्या चार वर्ग खोल्यांचे लोकार्पण समारंभा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पुढे बोलताना राठी म्हणाले की, या वर्ग खोल्या बांधून देण्यासाठी बालाजी अमाईन्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे कडून सामाजिक उत्तरदायित्व यानिधीतून आर्थिक सहकार्य मिळाले. बांधलेल्या चार वर्ग खोल्यांचा २०० मुलांना लाभ



मिळणार आहे. यावेळी राऊंड टेबल एरिया १५ चे चेअरमन तरंग शहा, सोलापूर टॉवेल सिटी राऊंड टेबल ३०९ चे अभिजीत मालानी, प्रकल्प निमंत्रक पुष्कराज कोठारी, आशुतोष राठी, ऋषिकेश नागावकर,आशिष तापडिया, पंकज सचदेव आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राम सातपुते यांना समस्त हिंदू संघटनांनी दिला पाठींबा

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर लोकसभा मतदारसंघातील समस्त हिंदू संघटनांच्या वतीने संयुक्त रित्या आयोजित हिंदुत्ववादी मेळाव्यात समस्त हिंदू संघटनांनी एकमुखाने जो राम को लाये हैं, हम उनको लायेंगे अशा घोषणा देत सोलापूर लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांना पाठींबा दिला. यावेळी समस्त हिंदू संघटनेचा उत्साह बघून लोकसभा विजयाचे आणि लोकसेवेचे बळ मिळाले.



पंतप्रधान मोदींमुळे देशवासियांचे राम मंदिराचे स्वप्न पूर्ण झाले, ही गोष्ट ऐतिहासिक आहे. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला आज काँग्रेसशासित राज्यांमध्ये आपल्या हिंदू माता-भगिनींवर होणाऱ्या अत्याचारांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. आपल्या देशाला सुरक्षित ठेवायचे असेल, तर मोदीजींच्या नेतृत्वातील भाजपा सरकारची देशाला आवश्यकता आहे. आम्ही सर्व हिंदू राम सातपुते यांच्या रूपाने एका हिंदू नेतृत्वासोबत असून माता-भगिनींच्या सुरक्षिततेसाठी मोदीजींच्या शिलेदाराला निवडून आणण्याचा आम्ही निर्धार केला आहे. त्यासाठी जोमाने काम करू, असे आश्र्वासन उपस्थितांनी दिले.

मोदींच्या कार्यकाळात राम मंदीर पुनर्निर्माणामुळे 'धार्मिक आस्थेचं' जतन होत आहे.

मोदींच्या सगळ्याच क्षेत्रातील ध्येय धोरणांमुळे आज देशाची प्रगती होत आहे. या बाबी लक्षात घेत मोदींना पुन्हा पंतप्रधान करण्याचा संकल्प केला. तसेच माझ्या उमेदवारीला जाहीर पाठींबा देऊन माझ्या विजयाचा विश्र्वास दर्शवला, याबद्दल समस्त हिंदू संघटनांचे मन:पूर्वक आभार मानतो असे राम सातपुते यावेळी म्हणाले. याप्रसंगी समस्त हिंदू संघटना, हिंदुत्ववादी बांधव तसेच माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर ग्रामीण हद्दीत विना परवाना ड्रोन प्रक्षेपण व वापर करण्यास मनाई

## पंतप्रधानांच्या दौऱ्यानिमित्त आदेश निर्गमित

सोलापूर/प्रतिनिधीः मा. पंतप्रधान महोदय, भारत सरकार हे दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी मौजे माळशिरस ता. माळशिरस येथे नियोजित दौ-यावर येणार असून, त्याअनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्याकरीता तसेच ड्रोन कॅमेराद्वारे छायाचित्रण होऊन त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता असल्याने ग्रामीण जिल्हयाच्या हद्दीत दि.२८ एप्रिल २०२४ रोजीचे ००.०१ वाजलेपासून ते दिनांक ३० एप्रिल२०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत विनापरवाना ड्रोन प्रक्षेपण व ड्रोनचा वापर करण्यास फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे मनाई आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

मा. पंतप्रधान महोदय, भारत सरकार यांचा दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्याच्या अनुषंगाने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखणे तसेच विनापरवाना ड्रोन प्रक्षेपण व ड्रोनचा वापर करण्यास मनाई आदेश पारीत करण्याबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक यांचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने अपर जिल्हा दंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये आदेश पारित केला आहे. सदरचा आदेश हा सोलापूर जिल्हयाचे ग्रामीण हद्दीत (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) हद्दीत लागू राहील. या आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम १८८ अंतर्गत दंडनीय असेल असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# श्री.वटवृक्ष मंदिरात श्री.गुरुलिलामृत पोथी पारायण सेवेस प्रारंभ

अक्कलकोट/श्रीशैल गवंडी : येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात श्री स्वामी समर्थांच्या १४६ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त समितीचे विश्र्वस्ता उज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्याखाली व मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव आत्माराम घाटगे यांच्या उपस्तिथीत मोठ्या भक्तीमय वातावरणात श्री.गुरुलीलामृत या पोथीच्या सामुदायिक पारायण सेवेस नुकतेच देवस्थानच्या ज्योतिबा मंडपात प्रारंभ झाले. सदर पारायण सेवा आज दिनांक २५ एप्रिल २०२४ ते दिनांक ०५ मे २०२४ अखेर सकाळी ८ ते ११:३० या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. या पारायण सोहळ्यात २६४ भाविकांनी सहभाग नोंदविले असल्याची माहिती सेक्रेटरी आत्माराम घाटगे यांनी दिली. महिला भाविकांची या सोहळ्यात अग्रक्रमाने उपस्थिती आहे. या प्रसंगी बोलताना विश्र्वस्त महेश गोगी यांनी श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी महोत्सवात पारायण सोहळ्यात श्री गुरुलीलामृत ग्रंथाचे पोथी वाचन म्हणजे पारायणकर्ते भाविकांना स्वामी भक्तीची व सेवेची मिळालेली सुवर्ण संधी असून सालाबादानुसार परंपरेप्रमाणे याही वर्षी देवस्थानने ही पारायण सेवेची संधी भक्तांना उपलब्ध करून दिली आहे.



आजपर्यंत अनेक पुरुष व महिला भक्तांनी पारायण केल्याने विविध अनुशंगाने स्वामींची प्रचिती येऊन जीवनातील विविध संकट तारून जीवन कृतार्थ झाले असल्याचे अनेक भक्तांचे मानणे आहे. भविष्यातही जास्तीत जास्त स्वामी भक्तांनी या पारायण सोहळ्यात सहभागी होऊन स्वामींचे आशीर्वाद आपल्या पाठीशी घ्यावे अशी भावना व्यक्त केली. या प्रसंगी देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्र्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, दयानंद हिरेमठ, श्रीपाद सरदेशमुख, गिरीश पवार, अविनाश क्षीरसागर, महेश मस्कले, श्रीशैल गवंडी, संजय पवार, संतोष जमगे, अक्षय सरदेशमुख, सिद्धाराम कुंभार, महेश काटकर, प्रसाद सोनार, बापू घोसले, शिवशरण अचलेर, दिपक जरीपटके, अमर पाटील आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

# विरोधकांना संस्थाही चालवता आल्या नाहीत तर त्या भंगारात विकल्या : रणजितसिंह निंबाळकर



टेंभुर्णी/प्रतिनिधीः विरोधकांना संस्था चालवता आल्या नाहीत, नव्हे तर त्या भंगारात विकल्या गेल्या. ठेवीदारांचे पैसेही न दिल्यामुळे अनेकांना आत्महत्या कराव्या लागल्या. हे सर्व लपवण्यासाठी सत्तेत राहण्याचा प्रयत्न चालला असल्याची सडकून टीका माढा लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार रणजितसिंह नाईक- निंबाळकर यांनी मोहिते-पाटील यांच्यावर केली. करमाळा विधानसभा मतदारसंघामध्ये प्रचारासाठी जिल्हा परिषद गट वांगी व केम येथील कार्यकर्त्यांची बैठक कंदर येथे घेण्यात आली, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार संजय शिंदे उपस्थित होते. पुढे बोलताना निंबाळकर म्हणाले की, केंद्रामध्ये मोदी सरकार येणार आहे. त्यामुळे आपल्या भागाचा विकास करण्यासाठी केंद्र सरकारकडून मोठी मदत होईल. आतापर्यंत केंद्र सरकारकडून पेन्शन योजना, दुष्काळ निधी अशा विविध योजना राबविण्यात आल्या आहेत. येथे विकास फक्त मोदीच करू शकतात. असे सांगून निंबाळकर म्हणाले, उजनीमध्ये कृष्णेचे पाणी आणण्यासाठी आपला प्रयत्न असून नीरेतून पाणी भीमेत आणणाऱ्या बोगद्याचे काम शेवटच्या टप्प्यात आलेले आहे. कृष्णेचे पाणी नीरेत आणण्यासाठी आपला पुढील काळात प्रयत्न राहणार आहे. जेणेकरून या भागांमध्ये पाण्याची कमतरता भासणार नाही व आपल्या उजनीवरील योजना बंद पडणार नाहीत. याची काळजी आम्ही पुढील काळात घेऊ, असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी आमदार शिंदे यांनी, करमाळा तालुक्यामध्ये आतापर्यंत केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडत विकासाच्या मुद्द्यांवर आपण आतापर्यंत मते मागितली आहेत. कोणावरही टीका न करता केवळ विकासाचा मुद्दा घेऊन आम्ही पुढे येत आहोत. त्यामुळे मतदारांनी विकासाला म्हणजे निंबाळकर यांना मत देऊन निवडून द्यावे, असे आवाहन केले. यावेळी जालिंदर बसळे, महेश चिवटे, रयत क्रांती संघटनेचे संतोष वारगड, गणेश चिवटे यांनी विचार व्यक्त केले. याप्रसंगी आबासाहेब साळुंके, नवनाथ भांगे, विलास पाटील, दीपक पाटील, राजकुमार पाटील, राजकुमार सरडे, सचिन रणसूनगरे, मारुती पारखे, भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना व मित्रपक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अक्कलकोटमधून भाजपला चांगले मताधिक्य मिळेल : आ.सचिन कल्याणशेट्टी

अक्कलकोट/प्रतिनिधीः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात केलेल्या विकासकामांबरोबरच अक्कलकोट शहरात झालेली कामे पाहता भाजपला चांगले मताधिक्य मिळेल, असा विश्वास भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला. गुरुवारी, महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ अक्कलकोट शहरातील प्रचाराचा शुभारंभ श्री स्वामी समर्थ समाधी मठ येथून आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, अक्कलकोट शहरासाठी भाजप सरकारने कोट्यवधी रुपयांचा निधी दिला आहे, त्यामुळे भाजपला मताधियय देणे हे मतदारांचे कर्तव्य आहे. त्यांनी ते यावेळी मतदानरुपी सहकार्य करून पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार देशामध्ये



आणावे, असे आवाहन केले. प्रचार शुभारंभानंतर बुधवार पेठ, धनगर गल्ली, कामाठी गल्ली, कारंजा चौक, ढाले वस्ती, मोरे वस्ती, गोल्ल गल्ली, वडार गल्लीमध्ये होम टू होम प्रचार करण्यात आला. मतदारांना पंतप्रधान मोदी यांनी केलेली विकासकामे सांगण्यात आली. राम सातपुते यांना भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन शहराध्यक्ष शिवशरण जोजन यांनी केले. यावेळी भाजप तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष नन्नू कोरबू, उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शिवराज स्वामी, नगरसेवक महेश हिंडोळे, भाजप शहर सरचिटणीस दयानंद बिडवे, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, बाळा शिंदे, नागू कुंभार, कांतू धनशेट्टी, अतिश पवार, अंकुश चौगुले, दयानंद रोडगे, रमेश कापसे, सुनील दसले, शरणू कापसे, सुनील आळ्ळोळी, अभिषेक लोकापुरे, शिवराज जकापुरे, सागर डिग्गे, बबलू भागानगरे, केदार माळशेट्टी, बप्पा उंबराणीकर, प्रथमेश जोजन, सिध्दाराम माळी, भारत भांडेकर व महायुती घटक पक्षाचे नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.